# शिफारस पत्र

प्रा.डॉ.ब.ना.तुरंबेकर
प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख,
डी.आर.माने महाविद्यालय,
कागल.

कु.स्मितांजली देविदास निकम यांनी "डॉ.सूर्यकांत खांडेकरांची साहित्य संपदा : एक अभ्यास" या विषयावरील शोधप्रबंधिकेचे लेखन माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकपणे पूर्ण केले आहे. यातील विवेचन स्वतंत्र आहे. शोधप्रबंधिकेतील मजकुराचा वापर त्यांनी यापूर्वी अन्यत्र कुठेही केलेला नाही.

ही शोधप्रबंधिका शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम्.फिल. परीक्षेच्या संदर्भात परीक्षणासाठी लेखिकेने सादर करावी यासाठी मी संमती दिली आहे.

प्रा.डॉ.बळवंत नाथा तुरंबेकर

कोल्हापूर
दि.१४/७/२००६

## -प्रतिज्ञापत्र-

"डॉ.सूर्यकांत खांडेकरांची साहित्यसंपदा : एक अभ्यास" ही शोधप्रबंधिका मी स्वत: लिहिलेली असून ती पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अथवा अन्य कुठल्याही परीक्षेसाठी ती सादर केलेली नाही. प्रथमच ती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम्.फिल.परीक्षेसाठी सादर करीत आहे.

कोल्हापूर

दि.१४/०७/२००६

कु. स्मितांजली देविदास निकम

# ऋणनिर्देश

"डॉ.सूर्यकांत खांडेकरांची साहित्यसंपदा : एक अभ्यास", या माझ्या शोधप्रबंधिकेला साकार करण्यात अनेकांचा अनेक परीने वाटा असला तरी काहींचाच ऋणनिर्देश येथे केला आहे.

माझ्या शोधप्रबंधिकेचे, मार्गदर्शक प्रा.डॉ.ब.ना.तुरंबेकर यांनी मला चिकित्सकदृष्टी व अभ्यासाची दिशा देऊन मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी मा. सौ.पूनम तुरंबेकर यांनीही मला वेळोवेळी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचीही मी ऋणी आहे.

माझे यजमान श्री. संदीप तुकाराम जाधव यांच्या सहकार्याशिवाय मी हे काम पूर्ण करूच शकले नसते. माझी बहीण प्रा. डॉ. सौ. अलका हेमंत वागदरे व माझे मेव्हणे प्रा.डॉ.अमर पांडे यांनी मला अभ्यासाचे संदर्भ मिळवून देण्यात बहुमोल सहकार्य केले.

डॉ.खांडेकरांच्या पत्नी श्रीमती अनुराधा खांडेकर व कन्या सौ.स्नेहा वाबळे यांनी मला खांडेकरांचे सर्वच साहित्य उपलब्ध करून दिले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

या सर्वांबरोबर माझी आई सौ.नलिनी निकम, माझे वडील श्री. देविदास निकम, भाऊ श्री गणेश निकम, माझ्या सासुबाई सौ.सुनिता जाधव व सासरे श्री. तुकाराम जाधव यांनी अभ्यासाला अनुकूल अशी भुमिका ठेऊन सतत या शोधप्रबंधिकेच्या लेखन कार्याचा पाठपूरावा केला.

याशिवाय माझी मुलगी कु. सायली आणि मुलगा चि. सारीश यांना या शोधप्रबंधिकेच्या लेखनाच्या दरम्यान मी पुरेसा वेळ देऊ शकले नाही त्यांचेही सहकार्य हे कौतुकास्पद आहे.

या कार्यात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे ग्रंथपाल व कर्मचारी, विलिंग्डन महाविद्यालयाचे ग्रंथपाल व कर्मचारी, श्रीमती कस्तुरबाई

वालचंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल व कर्मचारी यांनी मला नेहमीच मदत केली त्यामुळे मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

या शोधप्रबंधिकेचे टायपिंग करणारे श्री. विजय राजाराम कुलकर्णी (चैतन्य कॉम्प्युटर्स, मिरज) यांनी ही अत्यंत सुबक टायपिंग करून दिले व ॐ स्क्रिन प्रिंटर्स, मिरज यांनी सुबक बायडींग करून दिले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

कोल्हापूर
दि.१४/०७/२००६

कु. स्मितांजली देविदास निकम

# अनुक्रमणिका

"डॉ.सूर्यकांत खांडेकरांची साहित्यसंपदा : एक अभ्यास"


भूमिका — पृ. क्र. १,२

१) प्रकरण पहिले -: — पृ. क्र. ३ ते १५

डॉ.सूर्यकांत खांडेकर आणि मराठी कविता

२) प्रकरण दुसरे -: — पृ. क्र. १६ ते ५८

'सावली' आणि 'पानफूल' या कविता संग्रहातील

कवितांचा वाङ्मयीन अभ्यास

३) प्रकरण तिसरे -: — पृ. क्र ५९ ते ८८

डॉ. सूर्यकांत खांडेकरांच्या बालगीतांचे स्वरूप

४) प्रकरण चौथे -: — पृ. क्र. ८९ ते १३०

डॉ. सूर्यकांत खांडेकर यांच्या संपादित साहित्याचे स्वरूप

५) प्रकरण पाचवे -: — पृ. क्र. १३१ ते १३७

डॉ. सूर्यकांत खांडेकर यांच्या स्फूट लेखनाचे स्वरूप

६) प्रकरण सहावे -: — पृ. क्र. १३८ ते १४२

समारोप

७) डॉ.सूर्यकांत खांडेकरांच्या ग्रंथांची सूची — पृ. क्र. १४३ , १४४

८) संदर्भग्रंथ सूची — पृ. क्र. १४५

# भूमिका

मराठी वाङ्मय इतिहासाच्या वाटचालीत कविता उदंड लिहिली गेली. नव्या जाणिवा, नव्या संवेदना जागृत होऊन कवितेची कक्षा वाढली. त्यात केशवसूतांपासून पाडगांवकरांपर्यंत निसर्गकविता, प्रेमकविता, बालकविता लिहिली गेली आहे.

या अनुषंगाने निसर्गाच्या अनुभवातून मानवी मनाच्या भावभावनांचा आणि त्यांच्या जीवनानुभवांचा जो प्रत्यय अनेक कवींनी वाचकांना आणून दिला त्यात डॉ.सूर्यकांत खांडेकरांची कविता मराठी रसिकाला विशेष भावली. मुक्त शृंगाराचा गहिरा रंग, हिरवी बोली, उन्मुक्तता यामुळे त्यांची कविता विशेष सरस झाली. या साऱ्याच कवितांमधून कविचे भावमन अनुभवाला येते आणि त्या केवळ वाचनीय न ठरता चिंतनाचाही विषय होतात.

काव्यलेखनाबरोबरच डॉ.खांडेकरांना संपादन कार्याचीही विशेष आवड होती. त्यांनी ज्ञानेश्वरीचा पहिला, दुसरा व बारावा अध्याय विशेष रूपाने संपादित करून वाचकांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अधिक सोपा केला. मराठी ग्रामीण कथांचेही संपादन त्यांनी केले आहे.

डॉ. सूर्यकांत खांडेकरांनी आपल्या साहित्य निर्मितीने मराठी साहित्यक्षेत्रात एक वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांनी 'सावर्ली' व ' पानफूल' हे दोन कविता संग्रह लिहिले. तसेच 'छुमछुम' व ' चिमणेपंख' हे दोन बालगीतांचे संग्रहही लिहिले. अनेक भावगीते व चित्रपटगीतेही लिहिली. ज्ञानेश्वरी अध्याय पहिला, दुसरा आणि बारावा तसेच 'मराठी ग्रामीण कथा' हे त्यांचे संपादित साहित्य आहे. या साहित्याचा आजवर फारसा अभ्यास झालेला नाही.हा अभ्यास होणे गरजेचे होते प्रस्तूत प्रबंधिकेत खांडेकरांच्या स्वलिखित व संपादित साहित्याच्या स्वरूपाचा व वाङ्मयीन गुणविशेषांचा अभ्यास मांडला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये आधुनिक मराठी कवितेच्या पार्श्वभूमिवर डॉ.खांडेकर

यांच्या कवितेचा अभ्यास मांडला आहे. व खांडेकरांच्या कवितेचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. त्यांच्या काव्यविषयक जाणिवा कोणत्या होत्या याचाही परामर्श घेतला आहे. खांडेकरांची कविता भावसंपन्न आहे. या भावसंपन्नतेचे दर्शन त्यांच्या 'सावली' व 'पानफूल' या कविता संग्रहातील कवितांतून घडते. पावित्र्य, मांगल्य आणि शुचिता ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्य आहेत हे दाखवून देणे हे या अभ्यासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे या दृष्टिने अभ्यास करून हाती आलेले निष्कर्ष समारोपामध्ये मांडले आहेत.